सकाळ

# 'संजीवन'मध्ये अटल ऑनलाइन एफडीपी

पन्हाळा ता. ३ : संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन यांच्या सहयोगाने येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातर्फे सहादिवसीय अटल ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन ६ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केले आहे.

या कार्यक्रमासाठी एआयसीटीईकडून एक लाख रुपये निधी मंजूर आहे. एफडीपीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) संशोधन, शिक्षण, आरोग्यसेवा, उद्योग आणि नवनवीन व्यावसायिक संधींमध्ये होणारा बहुआयामी उपयोग उदाहरणांसह मांडला जाईल. सहभागींसाठी मूलभूत संकल्पना, अत्याधुनिक साधने, कार्यपद्धती तसेच शैक्षणिक आणि औद्योगिक दृष्टिकोनातून केस स्टडीजचा अभ्यास करण्याची संधी मिळेल. एआयसीटीई मान्यताप्राप्त संस्थांचे प्राध्यापक, संशोधक, पदव्युत्तर विद्यार्थी तसेच शासन व उद्योग क्षेत्रातील अधिकारी, तंत्रज्ञांना सहभागी होता येईल. कार्यक्रमाला चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. समन्वयक म्हणून विभागप्रमुख प्रा. राहुल नेजकर व प्रा. प्रवीण अतिग्रे काम पाहतील. आयोजनासाठी प्रा. एकनाथ साळोखे, दीपक पाटील, कृष्णात शिंदे, प्रा. समिंदर विभूते यांचे सहकार्य लाभले.

Kolhapur, Kolhapur-Today
04/10/2025 Page No. 6

# संजीवनमध्ये अटल ऑनलाइन एफडीपीचे उद्यापासून आयोजन

राष्ट्रगीत वृत्तसेवा-पन्हाळा

सोमवार पेठ, पन्हाळा येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स आणि ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) यांच्या सहयोगाने येथील कॉम्पुटर सायन्स अँड इंजिनीअरींग विभागाच्या वतीने "AI-Driven Technologies for Innovation, Research, Education, Healthcare and Business Applications' या विषयावर सहा दिवसीय अटल ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन केले असून ते सोमवार दि. ६ ते शनिवार दि. ११ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.

या कार्यक्रमासाठी एआयसीटीईकडून एक लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या एफडीपीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) संशोधन, शिक्षण, आरोग्यसेवा, उद्योग आणि नवनवीन व्यावसायिक संधींमध्ये होणारा बहुआयामी उपयोग प्रत्यक्ष उदाहरणांसह मांडला जाणार आहे. सहभागींसाठी मूलभूत संकल्पना, अत्याधुनिक साधने, कार्यपद्धती तसेच शैक्षणिक आणि औद्योगिक दृष्टिकोनातून प्रत्यक्ष केस स्टडीजचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

एआयसीटीई मान्यताप्राप्त संस्थांचे प्राध्यापक, संशोधक, पदव्युत्तर विद्यार्थी तसेच शासन व उद्योग क्षेत्रातील अधिकारी, तंत्रज्ञ यांना या कार्यक्रमात सहभागी होता येणार आहे.

या कार्यक्रमाला संजीवन संस्थेचे चेअरमन पी.आर. भोसले, सहसचिव एन.आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. समन्वयक म्हणून विभागप्रमुख प्रा. राहुल नेजकर व प्रा. प्रवीण अतिग्रे काम पाहणार आहेत. या एफडीपीच्या आयोजनासाठी शैक्षणिक अधिष्ठाता प्रा, एकनाथ साळोखे, रजिस्ट्रार दिपक पाटील, लेखापाल कृष्णात शिंदे, प्रा. समिंदर विभूते यांचे सहकार्य लाभले.

हॅलो प्रभात

# संजीवनमध्ये अटल ऑनलाइन एफडीपीचे आयोजन

पन्हाळा : हॅलो प्रभात

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स व एआयसीटीई यांच्या सहकार्याने कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागात "-I-Driven Technologies for Innovation, Research, Education, Healthcare and Business -pplications' या विषयावर सहा दिवसीय अटल ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन ६ ते ११ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.या उपक्रमासाठी एआयसीटीईकडून एक लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कार्यक्रमात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध क्षेत्रातील उपयोग प्रत्यक्ष उदाहरणांसह मांडला जाणार आहे. या आयोजनासाठी चेअरमन पी.आर.भोसले, सहसचिव एन.आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन यांचे मार्गदर्शन लाभले असून समन्वयक म्हणून प्रा. राहुल नेजकर व प्रा. प्रवीण अतिग्रे काम पाहणार आहेत.

# संजीवनमध्ये सहा दिवसीय अटल ऑनलाइन एफडीपी यशस्वीरीत्या संपन्न

राष्ट्रगीत वृत्तसेवा-पन्हाळा

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन यांच्या सहयोगाने येथील कॉम्पुटर सायन्स अँड इंजिनीअरींग विभागाच्या वतीने "AI-Driven Technologies for Innovation, Research, Education, Healthcare and Business Applications" या विषयावर सहा दिवसीय अटल ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम दिनांक ६ ते ११ ऑक्टोबर यादरम्यान यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमासाठी एआयसीटीईकडून एक लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला होता.

सहा दिवस चाललेल्या या एफडीपीमध्ये देशातील तसेच देशाबाहेरील विविध नामांकित तज्ज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा संशोधन, शिक्षण, आरोग्यसेवा, उद्योग आणि नवनवीन व्यावसायिक संधींमध्ये होणारा बहुआयामी उपयोग प्रत्यक्ष उदाहरणांसह मांडला. कार्यक्रमादरम्यान सहभागी प्राध्यापक, संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना एआयच्या मूलभूत संकल्पना, प्रात्यक्षिक उदाहरणे, औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील उपयोगी साधने व केस स्टडीज यांच्या माध्यमातून व्यावहारिक ज्ञान मिळाले.

सहभागी प्राध्यापक आणि तज्ज्ञांकडून संजीवन संस्थेच्या उत्कृष्ट नियोजनाचे आणि तांत्रिक आयोजनाचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाला चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून विभागप्रमुख प्रा. राहुल नेजकर व सहसमन्वयक प्रा. प्रवीण अतिग्रे यांनी काम पहिले. या एफडीपीच्या आयोजनासाठी प्रा. एकनाथ साळोखे, रजिस्ट्रार दिपक पाटील, कृष्णात शिंदे, प्रा. समिंदर विभूते, प्रा. विशाल पवार यांचे सहकार्य लाभले.

हॅलो प्रभात

# 'संजीवन' मध्ये अटल ऑनलाइन एफडीपी संपन्न

पन्हाळा : हॅलो प्रभात

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स व एआयसीटीई यांच्या संयुक्त विद्यमाने कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात AI-Driven Technologies for Innovation, Research, Education, Healthcare and Business applications या विषयावर सहा दिवसीय अटल ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ६ ते ११ ऑक्टोबर दरम्यान यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमासाठी एआयसीटीईकडून १ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. देश-विदेशातील तज्ज्ञांनी एआयच्या विविध क्षेत्रातील उपयोगांवर मार्गदर्शन केले. संजीवनच्या उत्कृष्ट नियोजनाचे सहभागी प्राध्यापकांनी कौतुक केले.